नियमित फौजदारी खटला नं. ८४२/२०२०
निशाणी- ३२

<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ चा जबाब.</u>

मी शपथेवर कथन करतो की,
माझे नांवः- सागर सुदर साळवे
वयः- ३८ वर्षे, धंदाः- नोकरी
राहणार- सुर्यनगर, तपोवन रोड, अहमदनगर

<u>सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी वकील श्रीमती सिमा शेख यांचेकडूनः-</u>

दि. १३/१२/२०१६ रोजी मला पोलिस स्टेशन येथे पंचनामा करण्यासाठी बोलावले होते. तेथे माझी फक्त सही घेतली. याव्यतीरीक्त काही केले नाही. मला दाखविण्यात आलेला पंचनाम्यावर क्र. २ वर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहित नाही. सहीस निशाणी क्र. ३३ देण्यात येते.

साक्षीदार सरकापक्षास सहकार्य करीत नसल्याने सरकारी पक्षाने उलटतपासणीची परवानगी मागीतली. परवानगी दिली.

<u>उलटतपास अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी वकील श्रीमती सिमा शेख यांचेकडूनः-</u>

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १३/१२/२०१६ रोजी पोलिसांनी मला नालेगाव येथे पंचनाम्यासाठी बोलावले होते. तेथे फिर्यादी निरामय राजेंद्र पवार उपस्थीत होते व त्यांनी घटनास्थळ दाखविले व त्यानुसर घटनास्थळ पंचनामा केला. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ शिवनेरी अपार्टमेंन्टच्या शेडलगत दिसत होते. हे म्हणणे खरे नाही की, शेडच्यापुर्वेस भींत आणि भींतीलगत रोड दिसत होता, दक्षीणेस शिवनेरी अपार्टमेंन्ट दिसत होता, तसेच उत्तरेस जनरल स्टोअर्स दिसत होता. हे म्हणणे खरे नाही की, असा पुर्ण पंचनामा माझ्या समक्ष तयार करण्यात आला व मी त्यावर वाचुन सही केली. हे म्हणणे खरे नाही की,मी आरोपीला वाचविण्याकरीता खोटी साक्ष देत आहे.

<u>उलट तपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. ए. ए. निंबाळकर यांनी नाकारला-</u>

उलटतपास संपला.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष,

LAXMIKANT SUDAMRAO PADHEN

Digitally signed by LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
DN: cn=LAXMIKANT SUDAMRAO PADHEN, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6946981, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.01.06 11:14:11 +0530

दि. ०३/०१/२०२६.

( एल. एस. पढेण )
मुख्य न्यायदंडाधिकारी
अहमदनगर.